सत्यमेव जयते

# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)
"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"


३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ (महाराष्ट्र राज्य) भारत.

**ई-मेल :** fra.govmh@gmail.com
**संकेतस्थळ :** www.mahafra.org
**संपर्क :** ०२२-३१९८०३४८ / ८८२८७ ८६२६४


क्रमांकः शुनिप्रा/सूचना/१३२९/२०२५ दिनांक : ०८/१०/२०२५

## सूचना

**वाचा :** १) प्राधिकरण कार्यालयाची दि. १३/०८/२०२५ रोजीची सूचना
२) प्राधिकरण कार्यालयाची दि. ०९/०९/२०२५ रोजीची सूचना
३) प्राधिकरण कार्यालयाची दि. १९/०९/२०२५ रोजीची सूचना

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम १४ (१) (क) नुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चे शुल्क निर्धारणाचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करण्याकरिता प्राधिकरणाच्या दि. १८/०९/२०२५ च्या बैठकीतील निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रस्तावाची लिंक दि. १९/०९/२०२५ पासून दि. ३१/१०/२०२५ पर्यंत सुरु ठेवण्यात आलेली आहे.

त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता प्राधिकरणाकडून वेळोवेळी सूचना देवून सुध्दा अंदाजे २००० संस्थांपैकी ४२५ संस्थांनीच प्रस्ताव ऑनलाईन भरण्याकरिता सुरुवात केली असल्याचे निदर्शनास येत आहे.

त्या अनुषंगाने संबंधित संस्थांना पुनश्चः सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चे प्रस्ताव ऑनलाईन सादर करण्याची अंतिम मुदत दि. ३१/१०/२०२५ असल्याने सदर मुदतीत प्रस्ताव सादर करावे. प्राधिकरणाकडून प्रस्ताव भरण्याकरिता मुदतवाढ देण्यात येणार नसल्याने ज्या महाविद्यालयांनी ऑनलाईन प्रस्ताव सादर केलेले नाहीत अशा महाविद्यालयाकडून सदर प्रस्ताव ऑनलाईन दिलेल्या मुदतीत सादर करण्यात यावे. प्राधिकरणाकडून देण्यात आलेल्या मुदतीत प्रस्ताव सादर न केल्यास कायद्याच्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

तसेच काही संस्थांकडून प्रस्ताव ऑनलाईन भरण्याकरिता आयकर विभाग/धर्मदाय आयुक्त अथवा इतर कार्यालयांकडून मुदतवाढ दिल्यामुळे ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत विनंती अर्ज प्राधिकरण कार्यालयात प्राप्त होत आहेत, या कार्यालयाने वेळोवेळी ऑनलाईन प्रस्ताव मुदतीत भरणेबाबत सूचना दिलेल्या आहेत त्यामुळे मुदतवाढ देण्याचा प्रश्न उद्भवत नाही करिता अशा संस्थांनी सुध्दा उक्त नमूद सूचनेचे पालन करावे.

Fees Regulating Authority ★ Maharashtra State ★

**डॉ. अर्जुन चिखले भा.प्र.से.**
**सदस्य सचिव**
**शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई**